**अलीकडे**

अलीकडे असंच होतं -
मनात असतं बरंच काही,
पण व्यक्तं करायला शब्दच नाही !

अलीकडे असंच होतं -
डोळ्याला दिसतं बरंच काही,
पण साठवून ठेवायची इच्छाच नाही !

अलीकडे असंच होतं -
ऐकू येतं बरंच काही,
पण गुणगुणणारा स्वरच नाही !

अलीकडे असंच होतं -
काळजाला भिडतं बरंच काही,
पण उच्चारण्याची सोयच नाही !!

**-प्रीती देशपांडे**
**www.meetipreeti.com**